**आरोपी पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

खुदा कसम सच कहता हुँ,

माझे नाव – सलमान सलीम बागवान
माझे वय ३८ वर्षे व्यवसाय हॉटेल
राहणार करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर.

**सरतपास आरोपी पक्षातर्फे वकील एन.के.खतीब यांचेमार्फत–**

१. फिर्यादी सुनंदा मच्छिंद्र कर्जुले यांचा मुलगा अमोल मच्छिंद्र कर्जुले हा माझा मित्र असल्याने माझी त्यांचेशी ओळख आहे. माझे अकोले येथे फळ विक्रीचे दुकान होते. अमोल मच्छिंद्र कर्जुले हा माझ्या दुकानावर यायचा. माझे व फिर्यादीमध्ये कधीही कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नव्हता व नाही. मला बँक ऑफ बडोदा शाखा–अकोले यांचेकडून नवीन चेकबूक मिळाले होते. माझ्याकडून चेकवरील सही चुकल्याने मी त्या चेकवर मागील व पुढील पानांवर रेषा मारल्या होत्या. तो चेक कोरा होता. तो चेक मी माझ्या दुकानामध्ये ठेवला होता. अमोल मच्छिंद्र कर्जुले याने माझ्या दुकानातून तो चेक माझ्या परस्पर व संमतीविना कधी नेला, हे मला माहित नाही. अमोल मच्छिंद्र कर्जुले व फिर्यादी यांनी मिळून त्या को–या चेकवर फिर्यादी यांचे नाव, रक्कम व तारीख टाकून तो चेक वटविण्यासाठी भरला. मला कोर्टाचे समन्स आल्यानंतर मी रद्द केलेल्या को–या चेकचा फिर्यादी व त्यांचा अमोल मच्छिंद्र कर्जुले यांनी गैरवापर केल्याचे मला समजले. याकामी दाखल असलेला निशाणी ४५ वरील चेक हा तोच चेक आहे. तो चेक मी कधीही फिर्यादी यांना दिलेला नव्हता. मी फिर्यादी व त्यांचा मुलगा अमोल मच्छिंद्र कर्जुले यांना कोणतीही रक्कम देय लागत नाही. त्या चेकमध्ये नमूद रक्कम रु.२,००,०००/– मी कधीही फिर्यादी अगर त्यांचा मुलगा

अमोल मच्छिंद्र कर्जुले यांचेकडून ऊसनवार घेतलेली नव्हती व नाही.

२. सन २०२०–२१ साली कोरोना महामारीमुळे सर्व कामकाज व व्यवहार ठप्प होते. मी सन २०२२ साली अकोले येथून करमाळा येथे राहण्यास गेलो. माझे संपूर्ण कुटुंब करमाळा येथे आहे. दिनांक २१.०८.२०२० रोजी फिर्यादी यांनी मला रक्कम रु.२,००,०००/– ऊसनवार दिली, हे म्हणणे खोटे आहे. फिर्यादी यांनी माझ्याविरुध्द ही खोटी केस दाखल केली आहे. फिर्यादी यांनी दिनांक २७.०९.२०२१ रोजी पाठविलेली नोटीस मला मिळालेली नाही. फिर्यादी यांनी त्यांचे फिर्यादीमध्ये व शपथपत्रामध्ये केलेली सर्व कथने खोटी आहेत. मी फिर्यादी यांना कोणतेही देणे लागत नाही. मी कोणताही गुन्हा केलेला नाही. त्यामुळे, मला या प्रकरणातून निर्दोष मुक्त करणेत यावे, ही नम्र विनंती.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास फिर्यादी पक्षातर्फे वकील श्री.वाय.एन.पांडे यांचेतर्फे–**

३. मी बँक ऑफ बडोदा, शाखा– अकोले येथे खाते उघडताना माझे आधारकार्ड व पॅनकार्ड दिले होते. माझ्या आधारकार्डवर कुंभार गल्ली, कमानवेस, अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर हा पत्ता आहे. आता मला निशाणी ६२ वरील खाते उघडण्याचा फॉर्म दाखविला. हे म्हणणे खरे आहे की, तो फॉर्म मी स्वत: भरला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी निशाणी ६२ वरील फॉर्मवर केलेली सही, निशाणी १० वरील वकील पत्रावर केलेली सही आणि निशाणी ४५ वरील चेकवरील सही सारख्याच आहेत. मी अकोले येथून करमाळा येथे कायमस्वरुपी राहण्यास जाण्यापूर्वी बँकेला माझा नवीन पत्ता कळविलेला नाही. मी आधार कार्डवरील पत्ता बदलून घेतला आहे. मी ते चेकबूक बँकेला परत केलेले नाही. अमोल मच्छिंद्र कर्जुले याने

माझा चेक मला न विचारता नेला आहे, अशी मी पोलीस ठाण्यामध्ये अगर बँकेकडे लेखी तक्रार केलेली नाही. ९८२३५६७७५३ हा माझा मोबाईल नंबर असून तो सध्या चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो मोबाईल नंबर माझ्या बँक ऑफ बडोदा, शाखा– अकोले या बँकेतील खात्याला जोडलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे ते खाते आजही चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला बँकेकडून माझ्या मोबाईल नंबरवर मेसेज येतात.

४. हे म्हणणे खरे नाही की, चेक बाऊंस झाल्याबाबत मला बँकेकडून मेसेज आला होता. चेक रद्द करावयाचा झालेस, त्या चेकवर "cancelled" असा शेरा मारावा लागतो किंवा कसे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, बँकेतील कर्मचारी यांनी कार्बन पेपर वापरल्यामुळे निशाणी ४५ वरील चेकवर ओरखडे पडले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व त्यांचा मुलगा अमोल मच्छिंद्र कर्जुले यांनी माझ्या चेकचा गैरवापर केला, अशी मी आजतागायत कोणत्याही पोलीस ठाण्यामध्ये तक्रार केलेली नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी यांनी दिनांक २७.०९.२०२१ रोजी माझे राहत्या पत्त्यावर नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की, चेक बाऊंस झालेबाबत मला फिर्यादी व त्यांचा मुलगा अमोल मच्छिंद्र कर्जुले यांनी कळविले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व माझेमध्ये चांगले संबंध असल्यामुळे मला आर्थिक अडचण असताना त्यांनी मला रक्कम रु.२,००,०००/– ऊसनवार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, ती रक्कम फेडण्यासाठी मी फिर्यादी यांना निशाणी ४५ वरील चेक दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी यांचेकडून घेतलेली रक्कम रु.२,००,०००/– बुडविण्याच्या हेतूने मी सरतपासामध्ये खोटी कथने केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.10 15:11:33 +0530

(डी.एम.हिंग्लजकर)
दिनांक – ०९.०३.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,
ता.अकोले, जि.अहमदनगर.